**<u>रे.दि.अपील क्र.२२१/२०१४</u>**

CNR - MHST01-002251-2014

## <u>निशाणी क्र.२४ खालील आदेश</u>

(हणमंत गणपत चव्हाण विरुध्द श्रीमती जगुबाई लक्ष्मण शिर्के व इतर)

रिस्पॉन्डंट क्र.४ यांच्याविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी हा अर्ज सादर केला आहे.

२) निशाणी क्र.२४ वरील अर्ज व त्यापुष्टयर्थ सादर केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. रिस्पॉन्डंटतर्फे दिलेले म्हणणे वाचले.

३) अपेलंटतर्फे असे कथन की, रिस्पॉन्डंट क्र.४ यांचे दिनांक २९/०५/२०१८ रोजी निधन झाले परंतु त्याबाबत उशीरा माहिती मिळाल्याने व त्यानंतर कोविड–१९ महामारीमुळे कामकाज बंद असल्याने त्यांच्या वारसांना प्रकरणात मुदतीत सामिल न केल्याने त्यांच्याविरुध्द अबेटमेंट आदेश पारित झाला. अपेलंटतर्फे न्यायाच्या दृष्टीने सदर अबेटमेंट आदेश रद्द होणेची विनंती केली आहे. रिस्पॉन्डंटतर्फे आक्षेप घेतला.

४) अपेलंटच्या कथनाप्रमाणे रिस्पॉन्डंट क्र.४ हे मयत झाल्यानंतर त्यांच्या मृत्यूबाबत उशीरा समजल्याने तसेच त्यानंतर कोविड–१९ महामारीच्या पार्श्वभुमीवर कामकाज बंद राहिल्याने त्यांच्या वारसांना मुदतीत सामिल केले नाही व त्यामुळे त्यांच्याविरुध्द अबेटमेंट आदेश झाल्याचे कथन केले आहे. रिस्पॉन्डंटतर्फे आक्षेप घेतला आहे. परंतु प्रकरणाचे स्वरुप पाहता अपीलाचा गुणदोषावर निकाल होणेकरीता अर्ज मंजुर करणे उचीत होईल. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## <u>आदेश</u>

(१) अर्ज (निशाणी क्र.२४) मंजुर करणेत येतो.

(२) मयत रिस्पॉन्डंट क्र.४ रविंद्र लक्ष्मण शिर्के यांच्याविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

सातारा. (नि.ह. जाधव)

दिनांक – ०५/०१/२०२४. जिल्हा न्यायाधीश–४, सातारा